महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
ईमेल- doj1.rfd@maharashtra.gov.in

---

**क्रमांक : जमीन-२०२४/प्र.क्र.३१/ज-१** **दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२४**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषय:-** भोगवटादार वर्ग-२ चा धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेत कारवाई करणेबाबत.

**संदर्भ:-** १) शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१,दि. ०८/०३/२०१९
२) शासन अधिसूचना क्र. जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१,दि.२७/०३/२०२३

"महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९" हे संदर्भ क्र. १ येथील दि. ०८ मार्च, २०१९ च्या अधिसूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. उपरोक्त अधिसूचनेतील तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये सवलतीच्या दराने रुपांतरीत करण्याचा कालावधी हा अधिसूचनेच्या दिनांकापासून ३ वर्षांपर्यंतचा होता.

**०२.** तर, संदर्भ क्र-२ येथे नमूद दि. २७ मार्च,२०२३ च्या अधिसूचने अन्वये सवलतीच्या दराने धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याचा कालावधी हा ३ वर्षांच्या ऐवजी ५ वर्ष करण्यात आलेला आहे. तसेच, नवीन परंतुक देखील समाविष्ट करण्यात आलेले आहे.

**०३.** दि. २७ मार्च, २०२३ च्या अधिसूचनेतील तरतूदीनुसार सवलतीच्या दराने भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याबाबतचा कालावधी हा दि. ०७ मार्च, २०२४ रोजी संपुष्टात येत आहे. उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता, अधिनस्त कार्यालयामध्ये विषयांकित प्रकरणी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी कोणा अर्जदारास / संस्थेस अधिमूल्याची रक्कम भरण्याच्या सूचना दिल्या असल्यास, अधिमूल्याची रक्कम चलनाने भरुन घेण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि. ०७ मार्च, २०२४ पूर्वी पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात यावी. जे अर्जदार / संस्था दि. ०७ मार्च, २०२४ पूर्वी अधिमूल्याची रक्कम भरणा करतील त्यांनाच सदर सवलत योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. दि. ०७ मार्च, २०२४ नंतर अधिमूल्याची रक्कम भरल्यास सवलतीच्या दराचा लाभ मिळणार नाही.

उपरोक्त बाब सर्व हितसंबंधितांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(धनंजय निकम)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) ज- समूहातील सर्व सह सचिव / उप सचिव
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) निवड नस्ती ज-१

c:\users\sunil.kotekar\desktop\२०२४\जमीन २०२४ प्र.क्र. ३१ ज-१ए वर्ग-२ चे वर्ग-१ रुपांतरण ltr.docx२

Scanned with OKEN Scanner